विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,
पुणेविभाग, पुणे यांचे कार्यालय,तळमजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५

दुरध्वनी क्र. ०२० - २९५२२४१८ ई-मेल : djr_pna@rediffmail.com

जा.क्र. विसनिपुणे/विकास/सोलापूर जिसम बँक/पीक कर्जाबाबत/२०२५/९३६६ दिनांक : १२/०८/२०२५

प्रति,

जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर

**विषय :- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पांगरी विकास सहकारी सोसायटी पांगरी ता. बार्शी जिल्हा सोलापूर यांनी शेतक-यांना कर्ज देण्यास नकार दिल्याने शेतकरी भाग्यवंत लक्ष्मण नायकुडे या शेतक-याला सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थेट कर्ज देणे संदर्भात आदेशित करावे.**

**संदर्भ** :- १. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,म.रा.पुणे जाक्रं. कृषीपत-०९/ सोलापूर जिमस बँक / पीक कर्जाबाबत /२०२५/१७८९ दिनांक : ०५/०८/२०२५ या कार्यालयास प्राप्त दि. ०७.०८.२०२५ रोजीचे पत्र.

२. श्री विठठल राजे पवार, अध्यक्ष तथा राष्ट्रीय निमंत्रक, शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटना महासंघ, पुणे यांचे दि.१४/०७/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेले श्री विठठल राजे पवार, अध्यक्ष तथा राष्ट्रीय निमंत्रक, शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटना महासंघ, पुणे यांचे दि. १४/०७/२०२५ रोजीचे पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे. सोबत मूळ प्रत जोडण्यात येत आहे.

श्री पवार यांनी त्यांच्या दि. १४/०७/२०२५ रोजीचे पत्रामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पांगरी विकास सहकारी सोसायटी पांगरी ता. बार्शी जिल्हा सोलापूर यांनी शेतक-यांना कर्ज देण्यास नकार दिल्याने शेतकरी भाग्यवंत लक्ष्मण नायकुडे यांना सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थेट कर्ज देणे संदर्भात आदेशित करणेबाबतची विनंती केली आहे.

प्रस्तूत प्रकरणी श्री पवार यांनी त्यांच्या पत्रात उपस्थित केलेल्या मुदयांस अनुसरून आपल्या स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत श्री पवार यांना कळवून त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

**सोबत : वरील प्रमाणे.**

(योगीराज सुर्वे)
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**
मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,म.रा.पुणे

**प्रत माहितीस्तव:-**
१. श्री. भाग्यवंत लक्ष्मण नायगुडे, राहणार. नायगुडे वस्ती, संग्रामनगर अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर
२. Vitthalraje Pawar, Sharad Joshi Vicharmanch Shetkari Kamgar MS Foundations, S No ३७, Naamvaibhav, Karnal Park, Kishan Shakti Bhavan, Keshvnagar, Mundhwa, Pune ४११०३६

३५

राष्ट्रीय कृषि और ग्रामीण विकास बैंक
महाराष्ट्र क्षेत्रिय कार्यालय
54 वेलेस्ली रोड, पो. बा .सं. 5 शिवाजीनगर, पुणे - 411 005
टेलीफोन: +91 20 25511083,25500100
फैक्स 020 - 25542250,
ईमेल: pune@nabard.org, वेबसाईट www.nabard.org

National Bank for Agriculture and Rural Development
Maharashtra Regional Ofice
54,Wellesley Road, Shivaji Nagar, Pune- 411005
Tel: +91 20 25511083,25500100,
Fax : (020) 25542250
E-mail: pune@nabard.org
Website:www.nabard.org

NB.MRO.DPD./FC/ 10326 /2013-14 dated 05 December 2013

Shri Vittal Pawar
"Nam Vaibhav" Changamal Creation and Publicity
Karnal Park, Keshav Nagar
Mundhwa, Pune

Dear sir

**Farmers Club Programme**

Please refer to your letter dated 25.11.2013 on the above subject. In this connection, we clarify that farmers clubs promoted by Institutional agencies like Commercial Banks, Cooperative Banks, Regional Rural Banks or grass-root level organisations like NGOS, PRIs, etc. are only eligible for assistance under NABARD programme provided these promoting agencies undertake to maintain the clubs beyond the agreed period of 3 years of NABARD assistance. It is desirable to form one club for one village and a club may have any number of farmers subject to a minimum of ten farmers. However, wilful defaulters of bank loans are not eligible for the membership. The officer bearers must be residents of the area of operation of the club. If the above, eligibility criteria are fulfilled you may approach a suitable promoting agency for the formation of a farmers club in the prescribed format and guidelines , duly recommended by our District Development Manager.

Yours faithfully

(V D Badhan)
Asst. General Manager

४९७

जा.क्र.अर्थ/वलिशे/पीकविमा/नुकसान भरपाई/२०१३
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक :- १७/०५/२०१३.

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,
पुणे/नाशिक.

विषय:- शेतीशी निगडीत कर्ज वसुलीस स्थगिती .
पीक विमा नुकसान भरपाईच्या रकमाबाबत

संदर्भ:- १) श्री.विठ्ठलराव नामदेव पवार,शेतकरी संघटना, पुणे.
२) श्री.बाळासाहेब रामचंद्र पटारे,शेतकरी संघटना,अहमदनगर.
३) महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.एससीवाय/प्र.क्र.४२८/म-७,दि.०९-०१-२०१३.
४) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.अर्थ/वशे/पीकविमा/कर्ज वसुली/२०१३, दि.२६-०४-२०१३.

18.6.13

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे.

२/- शासनाच्या महसुल व वन विभागाकडील **दिनांक ०९ जानेवारी २०१३** रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ज्या गावामध्ये ५० पैशा पेक्षा कमी पैसेवारी आहे अशा गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर केली असुन या गावांमधील शेतकऱ्यांकडील शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती दिलेली आहे. या पार्श्वभूमिवर अशा टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या गावांतील दुष्काळाची तीव्र परिस्थिती विचारात घेता शेतकऱ्यांना मिळणा-या पीक विमा नुकसान भरपाईच्या रकमा त्यांच्या कर्ज खात्याऐवजी बचत खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिनस्त बँकांना सूचित करावे, अशा परिपत्रकीय सूचना संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये आपणांस देण्यात आलेल्या आहेत. तथापी त्याबाबत कार्यवाही झाली नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

तरी याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, शेतकऱ्यांना मिळणा-या पीक विमा नुकसान भरपाईच्या रकमा त्यांच्या कर्ज खात्याऐवजी बचत खात्यात जमा करणे बाबत आपल्या स्तरावरुन सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सूचना द्याव्यात. या बँकांकडून शासन धोरणाचे पालन होत नसल्यास बँकेविरुध्द उचित कार्यवाही प्रस्तावीत करावी.

स्थळ प्रतिवर }
मा.सहकार आयुक्त }
यांची स्वाक्षरी असे }

सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.

प्रत माहितीसाठी :-

१) श्री.विठ्ठलराव नामदेव पवार,शेतकरी संघटना, "नामवैभव",चांगभलं क्रिएशन एन्ड पब्लिसिटी,योध्दा शेतकरी भवन,कर्नल पार्क,केशवनगर,मुंढवा,जि.पुणे,पिन-४११ ०३६.

महाराष्ट्र सहा | सामना
बुधवार, दि. २२ मे २०१३

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना
वर्ष : १८ अंक : ११८ ● (पृष्ठे ८) ● बुधवार, २२ मे २०१३ ● मूल्य : १.०० रुपये
★ नगर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर

# सोलापूर जिल्हा बँकेचा शेतकऱ्यांना २६ कोटींना गंडा

## पीकविम्याचे पैसे कर्ज खात्यात जमा ■ सहकार आयुक्तांचे कारवाईचे आदेश.

सोलापूर, दि. २१ (सा. वा.) - जिल्ह्यातील चोपन्न हजार शेतकऱ्यांना मिळालेले पीकविम्याचे २६ कोटी रुपये सोलापूर जिल्हा बँकेने परस्पर कर्जखात्यावर जमा करून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. असा आरोप करून सहकार आयुक्तांनी बँकेवर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. दरम्यान, कर्जखात्यावरील रक्कम शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर जमा करावी; अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे आदेश सहकार आयुक्तांनी दिले आहेत.

भीषण दुष्काळ असताना बेकायदेशीररीत्या पीकविमाची रक्कम परस्पर काढून घेण्यास चेअरमन आमदार दिलीप माने व कार्यकारी संचालक एम. डी. पाटील जबाबदार असल्याचा आरोपही शेतकरी संघटनेने केला आहे. या पार्श्वभूमीवर सहकार आयुक्तांनी शेतकऱ्यांकडून वसूल केलेली ही रक्कम तत्काळ परत करावी अन्यथा बँकेवर कारवाई करावी लागेल, असा आदेशही दिला आहे.

सोलापूर जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांपासून भीषण दुष्काळ आहे. या दुष्काळाच्या स्थितीतही सोलापूर जिल्ह्यातील ५४ हजार ३७१ शेतकऱ्यांनी हरभरा, करडई, ज्वारी यासह रब्बी हंगामातील पिकावर पीकविमा कर्ज उतरविले होते. याकरिता विमा कंपनीकडे एक कोटी सहा लाख रुपयांचा प्रीमियम भरलेला होता.

दरम्यान, भीषण दुष्काळामुळे या शेतकऱ्यांना २६ कोटी ८ लाख ४२ हजार २६१ रुपये सरकारने पीकविम्यापोटी बँकेला दिले आहेत. सदरची रक्कम या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर जमा होणे आवश्यक होते. परंतु जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सदरची पीकविमाची रक्कम शेतकऱ्यांना न देता त्यांच्या कर्ज खात्यावर वळवून परस्परीत्या बेकादेशीर मार्गाने रक्कम काढून घेतली. ही बाब उघडकीस आल्यानंतर शेतकरी संघटनेने सहकार आयुक्तांकडे तक्रार केली होती.

याप्रकरणी सहकार आयुक्तांकडे दाद मागितली असता सहकार आयुक्तांनी बँकेला सदरची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर जमा करण्याचा आदेश दिला आहे. अन्यता बँकेवर कारवाईची तंबी दिली आहे. भीषण दुष्काळात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअमरमन दिलीप माने व कार्यकारी संचालक एम. डी. पाटील व संचालक मंडळाने सक्तीची कारवाई करून कर्जाचा वरवंटा फिरविल्याचा आरोप सरचिटणीस विठ्ठल पवार यांनी केला.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने राज्य सरकारने ९ जानेवारी २०१३ रोजीच्या एका परिपतामध्ये ज्या गावात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आहे. अशा गावामध्ये टंचाईपरिस्थिती जाहीर केली असून, या गावातील शेतकऱ्यांकडून शेतीशी निगडित कर्जावर स्थगिती दिली असताना ही सुलतानी कारभाराच्या जोरावर सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ही कर्जवसुली करत आहे, असेही त्यांनी सांगितले.

सदरची पीकविम्याची रक्कम त्वरित न मिळाल्यास जिल्हा मध्यवर्ती बँकेवर व सहकार आयुक्त कार्यालयावर शेतकऱ्यांचा आसूड मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही पवार यांनी दिला आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गेल्या दोन महिन्यांपासून वादात सापडली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कर्जपुरवठा थांबविण्यात आला असून बँकेतील बड्या संचालकांनी साखर कारखान्यासाठी, शैक्षणिक संस्थेसाठी घेतलेले कोट्यवधी रुपयांचे कर्ज थकविले आहेत.

# पंढरपूर विभागात दुष्काळ निवारणासाठी १७६ कोटी खर्च

पंढरपूर, दि. २१ (प्रतिनिधी) - पंढरपूर विभागातील तीन तालुक्यांत दुष्काळ निवारणासाठी आजवर १७६ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती प्रांताधिकारी बाबासाहेब बेलदार यांनी दिली.

सर्वांत जास्त निधी सांगोला तालुक्यास १५० कोटी रुपये वितरित करण्यात आला आहे. टंचाईस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंढरपूर विश्रामगृहात अधिकाऱ्यांची बैठक बोलावण्यात आली होती. ज्यात प्रारंभी मदत व पुनर्वसनमंत्री पतंगराव कदम यांनीदेखील हजेरी लावली. या बैठकीनंतर बेलदार यांनी माहिती दिली.

सांगोला तालुक्यात सर्वांत जास्त खर्च झाला असून येथे सध्या ७२ गावांमध्ये ९१ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. मंगळवेढा तालुक्यांत १६ कोटी रुपये अवर्षण निवारणासाठी खर्च झाला आहे. येथे ७७ छावण्यांत ४१ हजार ९०२ जनावरे आहेत, तर ६० गावांत ७५ टँकर्स सुरू आहेत. पंढरपूर तालुक्यात ५६ गावांमध्ये ८३ टँकर्सच्या साहाय्याने पाणीपुरवठा सुरू असून येथे १९ जनावरांच्या छावण्यांमध्ये १५ हजार ८१७ जनावरे आहेत. या तालुक्यात आजवर १० कोटी रुपये खर्च झाले आहेत अशी माहिती प्रातांधिकारी यांनी दिली.

प्रादेशिक

बुधवार, दि. २२ मे २०१३ तीन । सामना



# सोलापूर जिल्हा बँकेकडून पीकविमा कर्ज खात्यात जमा

## शरद जोशी शेतकरी संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**पुणे :** सोलापूर जिल्हा बँकेने जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पीक विम्याची २६ कोटी रक्कम परस्पर कर्ज खात्यात जमा केल्याच्या निषेधार्थ आंदोलनाचा इशारा शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटनेने दिला आहे. याबाबतचे निवेदन संघटनेच्या वतीने सहकार आयुक्तांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की गेल्या तीन वर्षांपासून सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ पडत आहे. यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला असताना, सोलापूर जिल्हा बँकेने सुमारे ५४ हजार शेतकऱ्यांना मिळालेली पीक विम्याची २६ कोटींची रक्कम परस्पर कर्ज खात्यावर जमा केली आहे. एकीकडे राज्य शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची कर्ज सक्तीने वसूल करू नये, असा आदेश देत असताना मात्र सोलापूर जिल्हा बँक जबरदस्तीने पीक विम्याची रक्कम कर्ज खात्यावर जमा करून घेत आहे. ही वसुली तातडीने थांबवावी आणि पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळावी, अशी मागणी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा, सहकार आयुक्तालयावर मोर्चा काढण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

संघटनेच्या वतीने पुणे जिल्हा सरचिटणीस विठ्ठल पवार, प्रदेश युवा अध्यक्ष संजय कोले, अनिल घनवट, आबा ताकवणे, विनय हर्डीकर, हिराबाई पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

• सोपी
• सुरक्षित
• फायदेशीर

दैनिक साज
सोलापूर बातमीदार

सोलापूरकरांची आ...
बेस्ट चिवडा
आणि
गरम बटाटे ...
नवी पेठ, सोलापूर - ४१...
फोन - (०२१७) २७२...

• रजि नंबर ३१८२०।८० • सोमवार दि.२०/५/२०१३ • वर्ष ३४ वे • अंक ८१ • किंमत रु. १/- • पाने ४ (पोष्ट परवाना (G2/RNP/SLP/D/28/201...

**शेतकरी संघटनेचा आरोप**

# शेतकऱ्यांचे विमाक्लेम जिल्हा बँकेनं कर्जापोटी जमा केले

सोलापूर - (दि.२०) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेनं दुष्काळाच्या खाईत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी त्यांच्या विम्याच्या रक्कमा परस्पर कर्जापोटी खात्यावर जमा करुन घेतल्या या बद्दल शेतकरी संघटनेनं नाराजी व्यक्त केली असून सहकार आयुक्तांकडे केलेल्या तक्रारीनंतर याची दखल घेण्यात आली असून हे सर्व पैसे आता बँकेला शेतकऱ्यांना आठ दिवसात परत द्यावे अशी मागणी केली आहे. संघटनेचे प्रदेश सरचिटणीस विठ्ठलराव पवार यांनी आज सोलापूरात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

सोलापूर जिल्ह्यातून ५४ हजार ३७२ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेअंतर्गत बँकेकडे १ कोटी ८ लाख रुपये प्रिमीयम म्हणून जमा केले होते. त्यापैकी ४८ हजार ३३० शेतकऱ्यांना ३६ कोटी ८ लाख २६१ रुपये विमा कंपनीने क्लेममंजूर करुन जिल्हा बँकेतील शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले. मात्र जिल्हा बँकेन शेतकऱ्यांची कोणतीही सहमती नसताना आणि वसुलीची सक्ती करु नये असे सरकार खात्याचे आदेश असतानाही या विमा रक्कमेतून कर्जा पोटीची ३६ कोटी रुपये रक्कम परस्पर जमा करुन घेतली. ही बाब शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेनं सहकार आयुक्तांकडे तक्रारीसह निदर्शनास आणली होती. यानुसार सहकार आयुक्त पुणे यांनी चंटाई परिस्थिती गावामधील शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीस स्थगिती आहे. असे असतानाही अशी वसुली करणं तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पिक विमा रक्कम कर्ज खात्याऐवजी बचत खात्यात जमा करणं जरुरीचं असताना बँकेनं केलेली कार्यवाही उचीत नसल्याचं म्हंटलं आहे.